
Impact Factor-7.675

# B.Aadhar

Multidis

ISSUE No- (CCLXIX) 281








Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

SHIVAJI COLLEGE HINGOLI

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com* Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 41 | Mental &Social health- Not a destination, but a process **Dr.Suvarna Gorakshanath Shikare** | 186 |
| 42 | Reaction Kinetics With 1-Chlorobenzotriazole As A Versatile Oxidant Compound: A Review **Hullara Vinaoda** | 190 |
| 43 | पर्यावरण संवर्धन : एक सामाजिक अध्ययन प्रा. डॉ. प्रेमसिंग प्रल्हाद जाधव | 192 |
| 44 | उच्च शिक्षणात खेळाडूची गुणवत्ता वाढविण्यासाठी क्रीडा शिक्षकाची भूमिका एक-अभ्यास प्रा.डॉ. गुणाजी पांडुरंग नलगे | 194 |
| 45 | National Education Policy 2020: A Structural Reformation in Education **Dr. Subhash M. Vadgule** | 197 |


T.C.
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS.)

234

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 281 (CCLXXXI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# उच्च शिक्षणात खेळाडूची गुणवत्ता वाढविण्यासाठी क्रीडा शिक्षकाची भूमिका एक- अभ्यास

प्रा.डॉ. गुणाजी पांडुरंग नलगे
संचालक, शारीरिक शिक्षण आणि क्रीडा शिवाजी महाविद्यालय ,हिंगोली 431513
nalgegp21@gmail.com 9420038008

सारांश :-

जसा एखाद्या शाळेचा दर्जा हा त्या शाळेतील शिक्षकांच्या दर्जावर अवलंबून असतो तसाच खेळाडूंचा दर्जा हा त्याच्या प्रशिक्षकाच्या दर्जावर अवलंबून असतो. उच्च दर्जाचे खेळाडू निर्माण होण्यासाठी उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि प्रशिक्षक असावे लागतात. खेळाडूच्या प्रगतीत क्रीडा शिक्षकाची आणि उच्च दर्जाच्या साहित्याची आवश्यकता असते. तसेच उच्च दर्जाची मैदानी उपलब्ध होणे गरजेचे आहे. यासोबतच खेळाडूची मेहनत तितकीच गरजेची आहे. खेळाडूला खेळाची आवड किती आहे त्या चा कल कसा आहे त्यावर क्रीडा शिक्षक खेळाडूला घडवीत असतो. उत्कृष्ट प्रशिक्षका शिवाय उत्कृष्ट खेळाडू घडू शकत नाही. खेळ हा मुळात प्रत्येकाला खेळता येतो ती एक उपजत प्रवृत्ती आहे. त्याला आकार देण्याची, त्यात नियम बद्धता, सुधारणा, गुणवत्ता वाढविण्याचे काम हे उत्तम प्रशिक्षकच करू शकतो. लहान वयात प्राथमिक, माध्यमिक शाळेत बरेच जण मुलं-मुली कोणता ना कोणता खेळ खेळत असतात. तो खेळ म्हणजे मनोरंजन म्हणून कधी, तर कधी स्नेहसंमेलनानिमित्त खेळ म्हणून खेळला जातो. शालेय वयात खेळ खेळला जातो पण त्यामागे अशी कोणती अपेक्षा नसते की यातून आपल्याला आर्थिक लाभ व्हावा. ना घरच्यांना अपेक्षा असते ना खेळाडूला ना त्या शिक्षकाला. शालेय स्तरावर उच्च दर्जाची मैदाने उपलब्ध नसतात साहित्य पण अगदी मोजके आणि साधारण दर्जाचे असते. प्रशिक्षणाचा स्तर पण सामान्य असतो कारण त्या वयात मानपाण्याची, स्पर्धेची, उत्पन्नाची फार मोठी चाहूल लागलेली नसते. खरी स्पर्धा म्हणजे काय, उच्च दर्जाचा खेळ, उच्च दर्जाची मैदानी ही उच्च शिक्षण घेत असताना उपलब्ध होतात. उच्च शिक्षणात खेळाच्या व्यावसायि करणाची ओळख होते. खेळाकडे करिअर म्हणून बघितले जाते. महाविद्यालयीन स्तरावर अंतर महाविद्यालय स्पर्धा घेतल्या जातात. या स्पर्धेतून खेळाडूला खूप मोठ्या प्रमाणावर स्पर्धा खेळायला मिळतात, यातून उच्च दर्जाच्या स्पर्धात भाग घ्यायला मिळतो. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळायला मिळतात. त्या ठिकाणी मार्गदर्शन करणारे क्रीडा प्राध्यापक, मार्गदर्शक विद्या विभूषित असतात. आपला खेळाडू यशस्वी व्हावा म्हणून क्रीडा शिक्षक खेळाडूला उच्च दर्जाचे साहित्य, उत्कृष्ट मार्गदर्शन , उच्च दर्जाची मैदाने उपलब्ध करून देतो. यातून असे लक्षात येते की शालेय स्तरापेक्षा महाविद्यालय स्तरावर खेळाडूची खेळातील गुणवत्ता वाढण्यास मदत होते. यासाठी क्रीडा प्राध्यापकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

महत्त्वाचे शब्द :- प्रशिक्षण, प्रशिक्षक, दर्जा, उच्च शिक्षण, मैदाने, क्रीडा प्राध्यापक.

प्रस्तावना :-

समाजात शिक्षकाबद्दल नेहमी आदर असतो. शिक्षक हा समाज सुधारक असतो. समाजातील वाईट प्रथा, चालीरीती, वाईट विचार दूर करण्याचे काम करतो म्हणून शिक्षकाला मनाचे स्थान असते. त्यात क्रीडा शिक्षक अधिक महत्त्वाचा कारण तो शिस्त लावतो, मनोरंजन करतो, खेळ शिकवतो, विद्यार्थ्यात असलेले न्यूनगंड त्याच्या संवादाने दूर होतात. स्पर्धामुळे त्याच्यात नेतृत्वगुण येतात. यश - अपयश पचविण्याचे त्याला धाडस येते. क्रीडा शिक्षक खेळाडूत धाडस निर्माण करतो. अपयश आले तरी डगमगायचे नाही अपयशातूनच यश मिळत असते. शालेय स्तरावर प्राथमिक धडे मिळतात, खेळाची ओळख निर्माण होते. खेळाडूच्या आयुष्याला खरी कलाटणी ही महाविद्यालयीन स्तरापासून मिळते. महाविद्यालय स्पर्धा म्हणजे उच्च शिक्षणातील स्पर्धा, शालेय स्तरापर्यंत खेळ खेळणे, जिंकणे, ट्रॉफी मिळविणे त्यातच आनंद असतो. प्रमाणपत्र मिळण्यापर्यंतच अपेक्षा असते. पण उच्च शिक्षणात



235

Assistant Professor Shivaji College,Hingoli.

फक्त स्पर्धाच जिंकणे, ट्रॉफी मिळविणे एवढेच ध्येय नसते तर उत्तम दर्जाचा खेळ खेळणे, उच्च दर्जाच्या स्पर्धा जिंकणे हे असते. त्यातून व्यावसायिकत्व निर्माण होते. उच्च दर्जाच्या स्पर्धा ह्या व्यावसायिक असतात. जगण्याचे साधन निर्माण होते, उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होतात. आयुष्याला आकार देण्याचे खरे काम उच्च शिक्षण घेत असताना म्हणजे महाविद्यालय स्तरावर होते. या काळात आयुष्याला दिशा देण्याचे काम होते. क्रीडा प्राध्यापक हा खेळात उच्च स्तरावर जाण्यासाठी खेळाडू कडून अपार मेहनत करून घेतो, तंत्रशुद्ध खेळाचे मार्गदर्शन करतो, उच्च दर्जाचे साहित्य उपलब्ध करून देतो. या सर्वातून मिळणारे यश हे अतिशय मौल्यवान असते. क्रीडा शिक्षक खेळाडूला खेळातून मेहनत घेण्याचे शिकवितो. अपयशा नंतर मिळणारे यश हे अतिशय आनंद देणारे असते, यश-अपयश पचविण्याचे शिकवितो. नेतृत्व गुण विकसित करतो, टाईम मॅनेजमेंट म्हणजे वेळेचे महत्व शिकवतो. खेळाडू च्या आयुष्याला शिस्त लावण्याचे काम क्रीडा शिक्षक करतो. एकूणच असे म्हणता येईल की राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत जाण्यासाठी, ऑलिंपिक मेडल प्राप्त करण्यासाठी क्रीडा प्राध्यापकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

उद्दिष्टे :-

1. उच्च शिक्षणातील खेळाडूच्या गुणवत्तेचा आढावा घेणे.
2. खेळाडूची गुणवत्ता वाढविण्यासाठी क्रीडा प्राध्यापकाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

गृहीतके :-

1. खेळाडूसाठी उच्च दर्जाचे साहित्य आणि मैदाने उपलब्ध झाल्यास गुणवत्ता वाढेल.
2. खेळाडूंच्या कठीण परिश्रमाला उच्च मार्गदर्शन मिळाले तर ऑलिंपिक दर्जाचे खेळाडू तयार होतील.

विषय विवेचन :-

1) देशात सोयीसुविधायुक्त मैदाने कुठे कुठे आहेत.

महाराष्ट्राने एक पाऊल पुढे टाकले आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाची स्थापना बालेवाडी, पुणे येथे करण्यात आली आहे. 2021- 22 शैक्षणिक वर्षापासून क्रीडा प्रवेशाला सुरुवात करण्यात आली आहे. या विद्यापीठातील अभ्यासक्रमात क्रीडा विभागाचा कायापालट करण्यासाठी अत्यंत उपयोगी,उच्च दर्जाचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्यातून संशोधनाला मिळणार आहे. शिवछत्रपती क्रीडा संकुलात विविध खेळांच्या, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळ या ठिकाणी खेळल्या जाणार आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील तसेच भारतातील उच्च दर्जाचे खेळाडू तयार होणार. आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षके या ठिकाणी उपलब्ध होणार. सुरुवातीपासून म्हणजे इ.स. 1900 पासून भारत ऑलिम्पिक सारख्या स्पर्धात भाग घेतो. त्यावेळी नॉर्मन प्रीतचार्ड या एकमेव एथलिटने भारतातर्फे भाग घेतला. आतापर्यंत भारतीय खेळाडूंनी अनेक ऑलिंपिक स्पर्धात भाग घेतला आणि काही प्रमाणात पदके मिळविली पण आता इतक्या कमी पदकावर समाधान मानता येणार नाही. त्यासाठी अद्यावत मैदाने उपलब्ध करून देणे, आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षक नेमणे, अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे हे शासनाचे काम आहे. तेव्हा कुठे आपल्या खेळाडूची कामगिरी सुधारेल आणि आपला देश ऑलम्पिक मध्ये पदके प्राप्त करेल. म्हणून अत्याधुनिक उत्तम दर्जाचे मैदानी असणे गरजेचे आहे. असेच अद्यावत क्रीडा संकुल डेरवण ( कोकण) येथे तयार करण्यात आले आहे. जोपर्यंत खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा आणि मैदाने उपलब्ध होणार नाहीत तोपर्यंत त्यांच्याकडून पदकांच्या अपेक्षा करता येणार नाहीत.

2) आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मार्गदर्शकाची गरज

अत्याधुनिक मैदाने किंवा साहित्य असून चालणार नाही तर त्यासाठी उच्च दर्जाचे आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळलेले आणि स्पर्धा खेळवलेले मार्गदर्शक असणे तितकेच गरजेचे आहे. त्याशिवाय उच्च दर्जाचे खेळाडू तयार होणार नाहीत.

SHIVAJI COLLEGE HINGOLI
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

3) आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवणारी महत्त्वाची राज्य

ऑलम्पिक मेडल प्राप्त खेळाडू काही राज्यातच तयार होतात. कारण त्या राज्यात खेळाडूंना योग्य असे वातावरणआहे, मार्गदर्शन, प्रशिक्षण दिले जाते. खेळते वेळेस लागणारा पैसा शासनाकडून पूर्वीला जातो. मोठमोठी बक्षीसे दिली जातात, सरकारी नोकऱ्यात संधी दिली जाते त्या ठिकाणीच मोठ्या प्रमाणावर खेळाडू तयार होतात. यामध्ये महाराष्ट्र, हरियाणा, पंजाब, तामिळनाडू, दिल्ली, पश्चिम बंगाल,पूर्वोत्तर राज्य ही प्रमुख आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आता भारतात तयार होत आहेत. पुरुष खेळाडू बरोबरच महिला खेळाडू पण मोठ्या प्रमाणावर पदकांची कमाई करत आहेत. याला कारण आहे अद्यावत मैदाने, उत्तम प्रशिक्षक, उच्च दर्जाचे क्रीडा साहित्य, मोठमोठी बक्षीसे आणि शिष्यवृत्ती मिळत आहे. यामुळे पुढील काळात लवकरच भारतीय खेळाडू आपला धवधवा जगावर पाडतील यात शंका नाही आणि ऑलम्पिक पदके प्राप्त करतील यात वाद नाही.

या सर्वांसाठी क्रीडा स्पर्धातील उत्साह वाढण्यासाठी शासनाचे धोरण कारणीभूत आहे. खेळाला शिक्षणात महत्त्वाचे स्थान दिले तर पदकांची अपेक्षा करणे वाजवी ठरेल. खेळ काही प्रमाणात सक्तीचा करणे, त्या संदर्भात कायदे करणे गरजेचे आहे. आर्थिक तरतूद फार मोठ्या प्रमाणावर करणे गरजेचे आहे. प्राथमिक स्तरावर क्रीडा धोरण सक्तीची करणे गरजेचे आहे. गाव तिथे क्रीडांगण करणे गरजेचे आहे. त्याशिवाय ऑलम्पिक मध्ये मेडल मिळवण्याची अपेक्षा आपण करू शकत नाही.

निष्कर्ष

यावरून लक्षात येते की उत्तम दर्जाचे खेळाडू तयार होण्यासाठी उत्तम दर्जाचे प्रशिक्षक असणे गरजेचे आहे. त्याबरोबरच अद्यावत मैदाने, क्रीडा साहित्य असणे गरजेचे आहे. आर्थिक बाजू सुधारण्यासाठी मोठ-मोठी बक्षीसे, शिष्यवृत्ती खेळाडूंना देणे आवश्यक आहे. महिलांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना सुरक्षा देणे ,स्त्री पुरुष समानता असणे गरजेचे आहे. सर्वांना क्रीडा अभ्यासक्रम सक्तीचा करणे, गरीब खेळाडूंना, खेडेगावातील खेळाडूंना, गरिबीतून बाहेर काढून खेळाचे महत्व सांगणे, आर्थिक मदत करणे गरजेचे आहे. त्याशिवाय उत्तम दर्जाचे खेळाडू निर्माण होणार नाहीत आणि ऑलम्पिक मेडल मिळणार नाहीत.

संदर्भ ग्रंथ-

1) zeenews.india.com https://zeenews.india.com>sports

2)loktantrakiawaaz.co.in https://www.loktantrakiawaaz.co.in

3) https://tv9marathi.com>first

4) https://mr.m.wikipedia.org>wiki

T.C.
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)